स्वीयेत्तर सेवेतील अधिकारी/कर्मचारी यांच्या
प्रतिनियुक्ती कालावधीतील रजावेतन व
निवृत्तीवेतन अंशदानाच्या रकमा शासनाच्या
एकत्रित निधीत जमा करणेबाबत. . . . .

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
**संचालनालय, लेखा व कोषागार, मुंबई**
**ठाकरसी हाऊस, मुंबई पोर्ट ट्रस्ट-, ३ रा मजला,शुरजी वल्लभदास मार्ग,**
**बॅलार्ड इस्टेट, मुंबई ४०० ००१.**

क्र. संलेको/०४-२०१९/गोअक/कले/१००%शा.अनु.कार्यालये/६४ : ११ एप्रिल २०१९.

******************************************************************************************

## परिपत्रक

शासनाच्या पूर्णत: मालकीच्या वा नियंत्रणाखालील महामंडळ, मंडळ, प्राधिकरण इत्यादी सार्वजनिक उपक्रम तसेच संविधानिक संस्था, स्वायत्त संस्था यांच्या आस्थापनेवर, महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील अधिकारी / कर्मचारी यांची मंत्रालयीन, प्रशासकीय विभागामार्फत तसेच त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालयामार्फत लोकहितास्तव स्वीयेत्तर सेवेत प्रतिनियुक्तीने नियुक्ती केली जाते. ही नियुक्ती कर्मचाऱ्यांची बदली / पदोन्नती/उसनवारी तत्व इत्यादी कारणास्तव करण्यात येते.

महाराष्ट्र नागरी सेवा (स्वीयेत्तर सेवा) मधील नियम ४० अन्वये परिशिष्ट २ मधील नियम ११ नुसार प्रतिनियुक्ती कालावधीतील रजा वेतन आणि निवृत्तीवेतन अंशदाने स्वीयेत्तर नियोक्त्याकडून देण्यात येतील अशी तरतूद आहे . परंतु संचालनालयाच्या असे निर्देशनास आले आहे की, शासनाच्या नियंणाखालील काही मंडळे , स्वायत्त संस्था इत्यादी प्रतिनियुक्तीवरील कर्मचारी / अधिकारी यांच्या प्रतिनियुक्ती कालावधीतील रजावेतन व निवृत्तीवेतन अंशदानाच्या रकमा शासनाच्या एकत्रित निधीमध्ये जमा करीत नाहीत. याकारणास्तव प्रतिनियुक्तीवरील अधिकाऱ्यांना शासनाकडून “ ना देय प्रमाणपत्र” प्राप्त न झाल्याने त्यांच्या निवृत्तीवेतन प्रकरणाबाबत अडचणी निर्माण होतात आणि त्यामुळे कर्मचारी / अधिकारी निवृत्तीविषयक लाभापासून वंचित राहतात.

तसेच महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय दि. ०८.०४.२०१३ अन्वये , स्वीयेत्तर सेवेत प्रतिनियुक्तीने नियुक्ती केलेल्या कर्मचारी / अधिकारी यांच्या बाबतीत काही तरतुदी लागू केल्या आहेत. तसेच महालेखापाल, मुंबई या कार्यालयाने शासनाद्वारे १००% अनुदान प्राप्त होणाऱ्या कार्यालयांच्या सूचीबाबत विचारणा केली आहे. त्या अनुषंगाने , सर्व शासकीय / निमशासकीय कार्यालये तसेच शासनाच्या नियंत्रणाखालील महामंडळ, मंडळ, प्राधिकरण इत्यादी सार्वजनिक उपक्रम तसेच स्वायत्त संस्था इ. यांनी खालीलप्रमाणे माहिती संचालनालयास तात्काळ कळवावी :-

अ) आपले कार्यालय हे शासनाच्या पूर्णत: मालकीचे वा शासन नियंत्रणाखालील आहे याबाबतची माहिती संबंधित कागदपत्रासह पाठवावी.

ब) आपल्या आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्यासाठी शासनाकडून किती टक्के अनुदान प्राप्त आहे व ते अनुदान कधीपासून प्राप्त आहे याबाबतचा तपशील संबंधित कागदपत्रांसह पाठवावा.

अथवा

क) आपल्या आस्थापनेवरील प्रतिनियुक्ती कर्मचाऱ्यांचे वेतन आपले कार्यालय स्वत:च्या उत्पन्नाच्या साधनेतून देते

ख) ०किंवा कसे? याबाबतचा तपशील संबंधीत कागदपत्रांसह पाठवावा.

उपरोक्त मुद्यांची माहिती संचालनालयाच्या jd.kosh@mahakosh.in या ई-मेल पत्तयावर त्वरीत पाठविण्यात यावी.

(प्रगती धनावडे)
प्रभारी, सहाय्यक संचालक(गोअक)
संचालनालय, लेखा व कोषागारे,मुंबई.

प्रत: १. संबंधीत प्रतिनियुक्ती कार्यालयांचे मुख्यालय.
२. प्रशासन -राजपत्रित.
३. प्रशासन - सलेअ.